(53)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** बीड शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0033 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/02/2025 01:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 21/02/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/02/2025
**Time From (वेळेपासून):** 17:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/02/2025 **Time (वेळ):** 00:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2025 00:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बशीरगंज चौक बीड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अंगद राम दुनघव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं21/29, गौतम बुध्द कलनी,शाहुनगर, पांगरी रोड, बीड,बीड शहर, बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर नं21/29, गौतम बुध्द कलनी,शाहुनगर, पांगरी रोड, बीड,बीड शहर, बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9767779649

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अब्दुलरहिम अब्दुल मजीद अब्दुल | | | 1. राचांदणी चौक, दौउदपुरा, , भंगार दुकानजवळ पेटबीड,बीड, बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 16नोटा | 8,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

ला.प्र.वि.कार्यालय बीड

दिनांकः- 21/02/2025

मी अंगद राम दुनघव, वय-40 वर्ष, व्यवसाय-वाहन चालक, रा.घर नं.21/29, गौतम बुध्द कॉलनी, शाहुनगर, पांगरी रोड, बीड ता.जि.बीड मो.क्र.9767779649, आधार कार्ड क्र.751217477505
दि.18/02/2025 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.बीड यांचेकडे सानप डेव्हलपर्स, चऱ्हाटा रोड येथे सुरक्षीत ठिकाणी तक्रार दिली की, "माझे मेव्हणे श्री.सचिन महादेव कसबे रा.नांदुरघाट ता.केज जि.बीड यांचे नावे टाटा कंपनीचा टेम्पो असुन त्याचा पार्सिंग क्रमांक MH-25 P-3226 असा असुन सदरचा टेम्पो दि. 09/11/2024 रोजी माझे मेव्हणे श्री.सचिन कसबे यांचेकडुन भाडेतत्वावर चालविण्यासाठी वार्षीक 1,20,000/-रु. ने घेतलेला आहे. खाजगी इसम अब्दुल रहिम हे माझ्याकडे माझे टेम्पोची श्री.रंजीत पाटील, मोटार वाहन निरीक्षक, उप प्रोदशीक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड यांचेकडुन तपासणी करुन फिटनेस प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी स्वत:साठी व श्री.रंजीत पाटील यांचे नावे 10000/-रुपये लाचेची मागणी करीत आहेत. तसेच खाजगी इसम अब्दुल रहिम यांना यापुर्वी 1000/-रु. फोन पे द्वारे पाठवलेले आहेत. " वगैरे मजकुराची तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.18/02/2025 रोजी श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, यांनी मोटार वाहन निरीक्षक श्री.रंजीत पाटील व खाजगी इसम अब्दुल रहिम हे माझ्याकडे माझे कामासंदर्भाने लाचेची मागणी करतात किंवा कसे ? या बाबत मला व पंच क्र.1 श्री.बनकर यांना श्री.रंजीत पाटील व खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेकडे उप प्रादेशीक परिवहन अधिकारी पार्सीग ट्रॅक, शहाजनपुर (रुई) ता.जि.बीड येथे पाठवुन समक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. श्री.शंकर शिंदे यांनी मला व दोन्ही पंचाना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. श्री.शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये श्री.शंकर शिंदे यांनी स्वत:, दोन्ही पंच, व माझे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. श्री.शंकर शिंदे यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र-1 श्री.बनकर यांना माझेकडील मोटार सायकलने उप प्रादेशीक परिवहन अधिकारी पासीग ट्रॅक, शहाजनपुर (रुई) ता.जि.बीड येथे श्री.रंजीत पाटील व खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरच्या मदतीने लाचमागणी पडताळणी केली, त्याठिकाणी माझी श्री.रंजीत पाटील साहेब व खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेशी भेट झाली नाही. त्यामुळे मी खाजगी इसम अब्दुल रहिम यांना फोन केला असता, खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी मोबाईल फोनवर मला "आठ हजार रुपयामध्ये सगळेच गुत्ता म्हटलो होतो, साहेब गाडीमध्ये काय काय प्रॉब्लेम आहे ते काढतात, तीन खुट्याचे तीन हजार रुपये, साहेब आज नाहीत, विस तारखेलाच या डायरेक्ट " असे म्हणुन 8000/-रुपये लाचेची मागणी करुन दि.20/02/2025 रोजी बोलविल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा कारवाई स्थगित करुन दि.20/02/2025 रोजी लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. त्याबाबत श्री.शंकर शिंदे यांनी लाचमागणी पडताळणी पंचनामा केला आहे.
दि.19/02/2025 रोजी श्री.युनुस शेख, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.बीड यांनी मला फोन करुन कळवले की, श्री. शंकर शिंदे, पोलीस उपअधीक्षक, हे रजेवर गेल्याने त्यांनी आम्हास पुढील कारवाई करणेबाबत आदेशीत केले असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी पोनि/शेख यांना दि.20/02/2025 रोजी दत्तनगर, तळेगाव शिवार ता.जि.बीड येथुन कारवाई करणे बाबत विनंती केली.

त्यावरुन आज दि.20/02/2025 रोजी पोनि/शेख, पंच व स्टाफसह दत्तनगर, तळेगाव शिवार ता.जि.बीड येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आले. पोनि/शेख यांनी मोटार वाहन निरीक्षक श्री.रंजीत पाटील व खाजगी इसम अब्दुल रहिम हे माझ्याकडे माझे कामासंदर्भाने लाचेची मागणी करतात किंवा कसे ? या बाबत मला व पंच क्र.1 श्री.बनकर यांना श्री.रंजीत पाटील व खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेकडे उपप्रादेशीक परिवहन अधिकारी पासींग ट्रॅक, शहाजनपुर (रुई) ता.जि.बीड येथे पाठवुन समक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पोनि/शेख यांनी स्वत:, दोन्ही पंच, व माझे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. पोनि/शेख यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र-1 श्री.बनकर यांना माझेकडील मोटार सायकलने उप प्रादेशीक परिवहन अधिकारी पासींग ट्रॅक, शहाजनपुर (रुई) ता.जि.बीड येथे श्री.रंजीत पाटील व खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरच्या मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, त्याठिकाणी माझी व खाजगी इसम अब्दुल रहिम यांची भेट झाली. परंतु श्री.रंजित पाटील यांची भेट झाली नाही. त्यानंतर मी व पंच क्र.1 बनकर असे दत्तनगर, तळेगाव येथे सुरक्षीत ठिकाणी परत आलो. पोनि/शेख यांनी मला व पंच क्र.1 श्री.बनकर यांना माझेकडील मोटार सायकलने उप प्रादेशीक परिवहन अधिकारी पासींग ट्रॅक, शहाजनपुर (रुई) ता.जि.बीड येथे श्री.रंजीत पाटील व खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरच्या मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी माझ्याकडे माझे टेम्पो क्र. MH-25 P-3226 ची मोटार वाहन निरीक्षक श्री.रंजीत पाटील यांचेकडुन तपासणी करुन घेऊन फिटनेस प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी 10000/-रु. लाचेची मागणी करुन तडजोड अंती 8000/-रु.लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य केले. माझ्याकडे लाचेसाठी लागणारी आवश्यक लाच रक्कम 8000/-रु. उपलब्ध नसल्याचे सांगीतल्याने सापळा कारवाई स्थगित करुन दि.21/02/2025 रोजी खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले.

दि.21/02/2025 रोजी पोनि/शेख यांनी खाजगी इसम अब्दुल रहिम यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख यांनी सापळा कारवाईसाठी ॲन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवले तसेच सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पथक, पंच व मला सुचना दिल्या. पोनि/शेख यांनी मला खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार यांना दिसेल अशा दर्शनी ठिकाणी गळ्यातील गमजा डाव्या हाताने उजव्या खांद्यावर टाकावा असा ईशारा नेमुन दिला. त्याबाबत पोनि/शेख यांनी दि.21/02/2025 रोजी सापळा पुर्व कारवाईचा पंचनामा केला.

मी पोनि/शेख यांना कळविले की, खाजगी इसम अब्दुल रहिम यांच्याकडे पाठवण्यापुर्वी त्यांना फोन करुन त्यांची भेट कोठे होईल याबाबत विचारणा करावी असे सांगितले. त्यानंतर मी माझा मोबाईल क्र.9767779649 वरुन खाजगी इसम अब्दुल रहिम यांचा मोबाईल क्र.9284921818 वर फोन केला असता खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी "मला पासिंग ट्रॅकवर येऊ नका, मी बीडमध्ये आल्यावर नमाज झाल्यानंतर फोन करतो" असे सांगितले. त्यानंतर खाजगी इसम अब्दुल रहिम यांचा फोन आला नाही त्यामुळे मी पुन्हा त्यांना फोन करुन फिटनेस प्रमाणपत्र झाले का असे विचारणा केली. त्यावेळी खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी तुम्ही पैसे दिले का असे म्हणाले असता मी त्यांना पैसे देतो कुठयत तुम्ही असे विचारले तेंव्हा खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी मी नमाजला चाललोय, फोन करतो असे सांगितले. त्यानंतर मी खाजगी इसम अब्दुल रहिम यांना फोन केला असता त्यांनी मला भेटण्यासाठी बशीरगंज चौक बीड येथे बोलावले. त्यावरुन खाजगी इसम अब्दुल रहिम यांचे विरुध्द बशीरगंज चौक, बीड येथे लाचेचे सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोशि/राठोड यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियनला डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.1 श्री.बनकर यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 8000/-रु. लाच रक्कम खाजगी इसम अब्दुल रहिम यांना देण्यासाठी माझ्याकडील मोटार सायकलने बशीरगंज चौक, बीड येथे रवाना केले. पोनि/शेख हे सापळा पथकासह शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ येत होते. मी व पंच क्र.1 असे बशीरगंज चौक, बीड येथे गेलो. त्याठिकाणी खाजगी इसम अब्दुल रहिम हे न दिसल्याने मी त्यांना फोन केला त्यावेळी ते हनुमान मंदिर समोरील युवराज मेडीकल समोर उभे होते. त्याठिकाणी माझी व खाजगी इसम अब्दुल रहिम यांची भेट झाली. भेटी दरम्यान खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्याने मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 8000/-रुपये बाहेर काढून खाजगी इसम अब्दुल रहीम यांचे समोर धरली असता, खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी लाचरक्कम 8000/- रुपये डाव्या हाताने

स्विकारुन पँटचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी मला लाच स्विकारल्यानंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 17.10 वा. केला.
इशारा प्राप्त होताच पोनि/शेख, सापळा पथकातील सदस्य व पंच क्र.2 श्री.सोनवणे हे तात्काळ घटनास्थळी हजर आले. पोनि/शेख यांनी खाजगी इसम अब्दुल रहिम यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्यावेळी खाजगी इसम पळुन जाण्याच्या प्रयत्न करु लागला. त्यामुळे त्याठिकाणी रहदारीचे ठिकाण असल्यामुळे गर्दी जमा होऊ लागल्याने मी तेथुन थोड्या अंतरावर निघुन गेलो. माझे पाठोपाठ पोलीस अंमलदार श्री.अमोल खरसाडे यांनी येवुन माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर पोनि/शेख, पंच व सापळा पथकातील सदस्य खाजगी इसम अब्दुल रहिम यांना घेऊन शासकीय वाहनाने ला.प्र.वि.कार्यालय, बीड येथे हजर आले. त्यानंतर पोनि/शेख यांनी पंच क्र-1 श्री.बनकर यांना विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझे कडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.-1 श्री.बनकर यांनी सांगितले की, " खाजगी इसम अब्दुल रहिम यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम 8000/- रुपये डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील पँटचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली आहे " असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला.
पोनि/शेख यांनी खाजगी इसम अब्दुल रहिम यांना त्यांचे नाव पद पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव अब्दुल रहिम अब्दुल मजीद, वय-24 वर्ष, व्यवसाय-मजुरी रा.चांदणी चौक, दौउदपुरा, भंगार दुकानजवळ पेटबीड, बीड ता. जि.बीड मुळ रा. देगलुर नाका, उमर कॉलनी नांदेड असे सांगीतले. पोनि/शेख यांनी खाजगी इसम अब्दुल रहिम यांना लाचरकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे अंगावरील पँटच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख यांनी पंच क्र.2 सोनवणे यांना खाजगी इसम अब्दुल रहिम याचे पँटचे समोरील डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. पंच क्र.1 श्री.बनकर यांनी सापळापुर्व कारवाई पंचनाम्यातील लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक वाचुन दाखवले असता पंच क्र.2 श्री. सोनवणे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी वर्णन व क्रमांक एकच असल्याचे कळवुन लाचरक्कम 8000/- रुपये असल्याचे सांगीतले. पोनि/शेख यांनी सदरच्या नोटा पंच क्र.2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/शेख यांनी माझे टेम्पोच्या फिटनेस प्रमाणपत्राकरीता दिलेल्या कागदपत्रांबाबत खाजगी इसम अब्दुल रहिम यांना विचारणा केली. त्यावेळी त्यांनी सदरचे कागदपत्र श्री.रंजीत पाटील, मोटार वाहन निरीक्षक यांचेकडे असल्याचे सांगीतले. त्याबाबत दि.21/02/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे.
तरी खाजगी इसम अब्दुल रहिम अब्दुल मजीद, वय-24 वर्ष, व्यवसाय-मजुरी रा.चांदणी चौक, दौउदपुरा, भंगार दुकानजवळ पेटबीड, बीड ता.जि.बीड मुळ रा. देगलुर नाका, उमर कॉलनी नांदेड यांनी माझ्याकडे माझे टेम्पो क्र. MH-25 P-3226 ची मोटार वाहन निरीक्षक श्री.रंजीत पाटील यांचेकडुन तपासणी करुन घेऊन फिटनेस प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी 10000/-रु. लाचेची मागणी करुन तडजोडअंती 8000/-रु.लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन आज दि.21/02/2025 रोजी 17.10 वा.चे सुमारास लाच रक्कम 8000/-रु. युवराज मेडीकल समोर रोडवर, बशीरगंज चौक बीड येथे पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी खाजगी इसम अब्दुल रहिम यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Shitalkumar Ramnath Ballal(I (Inspector)) / POBN84531 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे बीड शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Shitalkumar Ramnat
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84531